cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२ | शुक्रवार दि.१२ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बाबा रामदेवांच्या हेकेखोरपणाला टाच

गतवर्षी २१ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या निवेदनाचे उल्लंघन केल्याबद्दल, योगगुरू बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी दोन स्वतंत्र प्रतिज्ञापत्रे सादर करून विनाअट माफी मागितली. पतंजली आयुर्वेदची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी यापुढे विशेषत: त्यांनी निर्मिती आणि विपणन केलेल्या उत्पादनांची जाहिरात किंवा ब्रँडिंगशी संबंधित कायद्याचे कोणतेही उल्लंघन होणार नाही, तसेच त्यांच्या वैद्यकीय गुणधर्मांविषयी किंवा कोणत्याही उपचारपद्धतीच्या विरोधात माध्यमांमध्ये कोणत्याही स्वरूपाची सहज विधाने केली जाणार नाहीत अशी हमी सर्वोच्च न्यायालयाला दिली होती.

### मोदी वगळता सर्व पंतप्रधानांनी विरोधकांचा सन्मान केला–शरद पवार

पुणे : नरेंद्र मोदी पंतप्रधान पदाची कितपत प्रतिष्ठा राखताहेत हा प्रश्न मला पडतो. मोदी वगळता सर्व पंतप्रधानांनी विरोधकांचा सन्मान केला. लोकशाहीत विरोधकांना महत्व आहे आणि मोदी सांगतात एकही विरोधकांना निवडून देऊ नका. असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला. राष्ट्रवादीत शरद पवार गटात पक्षप्रवेश वाढत आहेत. धैर्यशील मोहिते पाटील दोन दिवसात शरद पवार गटात प्रवेश करणार असून, जनमानसातले स्थान लक्षात घेऊन पक्ष निर्णय घेत असल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

# तुफान गारपीट..क्षणात होत्याचे नव्हते झाले !

## वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने फळबागा, उन्हाळ पिके उद्ध्वस्त

**बीड । प्रतिनिधी**

**मोठ्या प्रमाणात खर्च करून उन्हाळ पिके आणि फळबागा शेतकऱ्यांनी जोपासल्या होत्या. सध्या आंबा व इतर पिके जोमात असतानाच गुरुवारी दुपारनंतर बीड जिल्ह्यातील गेवराई, धारूर आणि वडवणी तालुक्यात तुफान गारपीट झाली. तर अंबाजोगाई तालुक्यात वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस झाला. यात झाडे उनगळून पडली तर उन्हाळ पिके जमीनदोस्त झाली. आंब्याच्या फळबागांचे अतोनात नुकसान झाले असून अवकाळी पावसाने छोटे नदी व नाले तुडुंब भरून वाहत होती. जिल्ह्यात झालेल्या गारपीटीने क्षणात होत्याचे नव्हते झाले.**








## वडवणी तालुक्यात पावसासह गारपीट

### फळझाडांसह उन्हाळ पिकांचे अतोनात नुकसान

**अर्जुन मुंडे। वडवणी**

**वडवणी तालुक्यात काल दुपारी अचानक झालेल्या विजेच्या कडकडाटास गारांच्या पावसाने शेतकर्यांची चांगलीच तारांबळ उडाली तर शेतकर्यांच्या शेतातील आंबा टरबुज खरबुज,गहु,ज्वारी,बाजरी अदी पिकांचे मोठ्या प्रमाणात अतोनात नुकसान झाले आहे.शेतकर्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.**

वडवणी तालुक्यातील शेतकरी अगोदरच दुष्काळामध्ये होरपळत असतांना काल दुपारी झालेल्या विजेच्या कडकडाटासह गारांच्या पावसाने



शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील मोठमोठी झाडे उन्मळून पडली तर अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेली.आनेक ठिकाणी

पान २ वर

## गेवराई तालुक्यात सिरसमार्गला गारपिटीचा तडाखा

**सिरसमार्ग । प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने बीड जिल्ह्याला चांगलेच झोडपले आहे. त्यात गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग परिसरात गारपिटीचा चांगलाच तडाखा बसला. यामध्ये फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, रस्त्यावरील झाडे उन्मळून पडली आहेत. शिवाय सिरसमार्ग गावातील अनेक घरांवरील पत्रे देखील उडून गेली आहेत.



गुरूवारी दुपारी तीन च्या सुमारास अचानक वादळाला सुरूवात झाली. थोड्याच वेळात अतिशय

पान २ वर

## धारूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस

### अर्धा तास गारपीट; नदी–नाल्यांना पाणी

**अविनाश ठोंबरे । धारूर**

**तालुक्यात गुरुवारी दुपारी तीन ते चार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली . या पावसामध्ये अर्धा तासझालेल्या गारपिठीचा सात ते आठ गावांना तडाखा बसला . यामुळे अंबा ,डाळिंब, चिंच या फळ पिकांसह उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान**



**झाले आहे . वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने अनेकांच्या घरावरील पत्रे उडाल्याने हाहाकार उडाला होता .**

तालुक्यात गुरुवारी दुपारी तीन ते चार

पान २ वर

## नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा– मुंडे



बीड, धारूर आणि वडवणी तालुक्यात ११ एप्रिल रोजी दुपारी चार ते साडेचार वाजण्याच्या दरम्यान वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. यामध्ये फळबागा, भाजीपाला आणि इतर पिकांचे नुकसान झाले आहेत. प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रा. ईश्वर मुंडे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## सलग तिसऱ्या दिवशी अवकाळी पाऊस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरासह तालुक्यात मंगळवार, बुधवार नंतर गुरूवार दिनांक ११ एप्रिल रोजी दुपारी सलग पडलेल्या अवकाळी पावसाने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. हा पाऊस देखील अंबाजोगाई तालुक्यात अनेक ठिकाणी कोसळला. गुरूवारी देखील सोसाट्याचा वारा आणि वीजांचा प्रचंड कडकडाट झाला. काही ठिकाणी वीज कोसळल्याचे समजते. हलक्या पावसाने पुन्हा वीज पुरवठा खंडित झाला होता. मुस्लिम बांधवांना ईद सण साजरा करताना अवकाळी पावसामुळे काही काळ अडचण निर्माण झाली होती.

यंदा पाण्याचे दुर्भिक्ष फेब्रुवारी, मार्च महिन्यांपासून जाणवायला लागले आहे. कारण, गतवर्षी पावसाळ्यात अत्यल्प प्रमाणात पाऊस झाला होता.

पान २ वर

## खामगावात वीज पडून म्हशीचा मृत्यू

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहर व तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशी अवकाळीचा तडाखा सुरूच असून दुपार नंतर सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी बरसत आहे.गुरुवार दि ११ रोजी सायंकाळी सुरु झालेल्या अवकाळी आणि विजेच्या कडाक्याने तालुक्यातील खामगाव शिवारात वीज पडून दुभत्या

पान २ वर



## सिमिंद्राबाई कदम यांचे निधन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील तडोळा येथील सिमिंद्राबाई गोविंदराव कदम, पाटील (वय १०५) यांचे गुरुवारी (दि.११) पहाटे वृध्दापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर सकाळी अकरा वाजता गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. गावचे पोलीस पाटील रावसाहेब कदम पाटील व पत्रकार अशोक कदम यांच्या त्या मातोश्री होत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : ६६.५० क्विंटल | २,२६१ | ३,०१९ | २,४९३ |
| ज्वारी/हायब्रिड :२६३.०० क्विंटल | १,६०० | ३,७८१ | २,७३४ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ७०.०० क्विंटल | ९,०५० | १०,८५६ | १०,५६५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,७११ | २,७५० | २,७२७ |
| चिंचोका/लोकल: ११.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: २९८.५० क्विंटल | ४,४५० | ४,७५१ | ४,६९४ |
| हरभरा: १४.५० क्विंटल | ५,००१ | ५,६०१ | ५,४४६ |

# लोकतंत्र युट्युब चॅनेल शेतकऱ्यांचा आवाज व्हावा: कृषी मंत्री धनंजय मुंडे

## राज्यस्तरावरुन लोकतंत्र यूट्यूब चॅनेलचा श्री गणेशा, डिजिटल प्लॅटफॉर्मवर धमाकेदार एन्ट्री



**बीड। प्रतिनिधी**

**प्रसार माध्यम आणि समाज माध्यमांचा प्रभाव पाहता दैनिक राज्य लोकतंत्रचे यूट्यूब चनेल शेतकऱ्यांचा आवाज व्हावा, अशी अपेक्षा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मुंडे यांच्या हस्ते लोकतंत्रच्या युट्युब चॅनेलचा श्री गणेशा झाला.**

आजच्या काळामध्ये सोशल मीडियाचे महत्त्व वृत्तपत्र माध्यमांपेक्षा जास्त आहे. चालता फिरता सोशल मीडियावरील म्हणजेच युट्युब वरील बातम्या मोबाईलच्या माध्यमातून कधीही पाहता येतात. त्यामुळे तरुणांसह वयोवृद्धांना सुद्धा युट्युब चॅनलचे महत्व वाटू लागले आहे. त्यामुळे दैनिक राज्य लोकतंत्रने युट्युब डिजिटल प्लॅटफॉर्मवर पदार्पण करण्याचे ठरवले. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर हॉटेल यशराज इन येथे लोकतंत्रच्या यूट्यूब चॅनेलचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, दैनिक राज्य लोकतंत्र या वृत्तपत्राने आतापर्यंत शेतकरी व सामान्य माणसांसाठी मोठे कार्य केले आहे. आता हे वृत्तपत्र युट्युबच्या प्लॅटफॉर्मवर पदार्पण करत आहे. लोकतंत्र यूट्यूब चनेलकडून शेतकऱ्यांसह

पान २ वर

### महाराष्ट्रभर प्रतिनिधींचे जाळे निर्माण करणार–मोकाशे

राज्य लोकतंत्र हे युट्युब चॅनेलचे पुणे येथे मुख्य कार्यालय राहणार असून राज्यभर प्रतिनिधींचे जाळे निर्माण केले जाणार असल्याची माहिती निवासी संपादक गणेश मोकाशे यांनी यावेळी बोलताना दिली.

## पठाण मांडवा परिसरात बिबट्याचा वावर

### ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण




अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यात एक खळबळजनक घटना समोर आली आहे. शहरापासून जवळ असलेल्या साकुड पठाण मांडवा परिसरात बिबट्याचा वावर दिसून आला आहे. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

साकुड पठाण मांडवा परिसरात एका शेतकऱ्याला मंगळवार, दिनांक ९ एप्रिल रोजी रात्री बिबट्या दिसून आला. त्या शेतकऱ्याने गावातील ग्रामस्थांना याची खबर दिली. गावातील ग्रामस्थांनी तातडीने जमा होऊन बिबट्याला हुसकावून लावण्यासाठी

पान २ वर

# डाळींच्या किंमती शंभरी पार!

## निवडणूक असल्याने सरकार गंभीर तर शेतकऱ्यांचे नुकसान



**पुणे । प्रतिनिधी**

**सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांनी प्रचाराला सुरुवात केली असून, अशा स्थितीत देशात कोणत्याही प्रकारची महागाई वाढू नये म्हणून केंद्र सरकार प्रयत्न करताना दिसत आहे. सध्या डाळींच्या किंमतीत मोठी वाढ होताना दिसते आहे. डाळिंच्या किंमतीने शतक गाठले आहे. अशा स्थितीत किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने मोठे पाऊल उचलले आहे.**

डाळींच्या वाढत्या किंमती रोखण्यासाठी सरकारने हस्तक्षेप केला आहे. व्यापाऱ्यांनी विविध डाळींचा साठा केला आहे हा साठा जाहीर करावा, अशा सूचना केंद्र सरकारने विविध राज्यांना दिल्या आहेत. केंद्र सरकार डाळींच्या साठ्यावर लक्ष ठेवून आहे. तसेच आयात केलेल्या डाळींच्या साठ्यावरही सरकार लक्ष ठेवून आहे. सध्याचा विचार केला तर तुरीच्या डाळीत मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने दरात वाढ होत आहे. तुरीची डाळ सध्या

पान २ वर

### सरकारच्या उपाययोजना मात्र शेतकरी अडचणीत

लोकसभा निवडणुकीत मतदारांचा कोणत्याही प्रकारचा रोष येऊ नये म्हणून सरकार महागाई रोखण्याचा प्रयत्न करत आहे. महागाई कमी करण्यासाठी सरकार विविध धोरणे आखत आहे. कांद्याच्या निर्यातीवर बंदी हे त्याचेच उदाहरण आहे. सरकारच्या धोरणाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच गहू आणि तांदळाच्या बाबतीत देखील सरकार किंमती वाढू नये म्हणून पावले उचलली आहेत. गहू आणि तांदळाचा साठा जाहीर करणे व्यापाऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे.

# छत्रपती घराण्याचा अपमान सहन करणार नाही–सतेज पाटील

**कोल्हापूर । पतिनिधी**

**'खासदार संजय मंडलिक हे स्वत:च्या स्वार्थासाठी श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांवर टीका करत आहेत. त्यामुळे आता कोल्हापूरची जनता हा अपमान सहन करणार नाही. सुरुवात त्यांनी केली आहे, शेवट कोल्हापूरची जनता करेल,' असे जोरदार प्रत्युत्तर आमदार सतेज पाटील यांनी खा. संजय मंडलिक यांना दिले. खासदार मंडलिक यांनी श्रीमंत शाहू महाराज छत्रपतींबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून ते बोलत होते.**



सतेज पाटील पुढे म्हणाले की, 'कोल्हापूरकर हा

पान २ वर

### संजय मंडलिक काय म्हणाले?

आताचे महाराज हे कोल्हापूरचे आहेत का? ते खरे वारसदार नाहीत, असे विधान खासदार संजय मंडलिक यांनी केले आहे. ते सुद्धा दत्तक आले आहेत, त्यामुळे तुम्ही आम्ही आणि ही कोल्हापूरची जनताच खरी वारसदार असल्याचे संजय मंडलिक म्हणाले. माझे वडील सदाशिवराव मंडलिक साहेबांनी खऱ्या अर्थाने पुरोगामी विचार जपल्याचे संजय मंडलिक म्हणाले. मल्लाला हात लावायचा नाही, मल्लाला टांगच मारायचा नाही, मग ती कुस्ती कशी होणार? असाही सवाल संजय मंडलिक यांनी केला. चंदगड तालुक्यातील नेसरी येथे झालेल्या सभेत खासदार संजय मंडलिकांनी अशा वक्तव्यांची मालिका केली.

cmyk

## अग्रलेख

# बाबा रामदेवांच्या हेकेखोरपणाला टाच

गतवर्षी २१ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या निवेदनाचे उल्लंघन केल्याबद्दल, योगगुरू बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी दोन स्वतंत्र प्रतिज्ञापत्रे सादर करून विनाअट माफी मागितली. पतंजली आयुर्वेदची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी यापुढे विशेषत: त्यांनी निर्मिती आणि विपणन केलेल्या उत्पादनांची जाहिरात किंवा ब्रँडिंगशी संबंधित कायद्याचे कोणतेही उल्लंघन होणार नाही, तसेच त्यांच्या वैद्यकीय गुणधर्माविषयी किंवा कोणत्याही उपचारपद्धतीच्या विरोधात माध्यमांमध्ये कोणत्याही स्वरूपाची सहज विधाने केली जाणार नाहीत अशी हमी सर्वोच्च न्यायालयाला दिली होती. पतंजलीवर या हमीचे पालन करणे बंधनकारक आहे असे न्यायालयाने बजावले होते. कोणालाही कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करताना आपल्या उत्पादनात कोणते गुण आहेत, ते इतरांपेक्षा कसे चांगले आहेत, हे सांगण्याचा अधिकार आहे. परंतु असे करताना अन्य उत्पादनांची नावे घेऊन त्यांना बदनाम करण्याचा अधिकार नाही. दुसरी मोठी रेषा ओढून तुम्हाला तुमचा मोठेपणा दाखवता येतो, दुसऱ्यांनी काढलेली रेषा पुसून नव्हे. परंतु हजारो कोटी रुपयांचे ब्रँड झालेल्या पतंजलिला या गोष्टीचे भान राहिले नाही.

याआधी बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांच्या उत्पादनाबाबत अनेक गंभीर तक्रारी आल्या होत्या. शासकीय प्रयोगशाळेतील तपासणीत त्यांची उत्पादने निकषानुसार नाहीत, असे आढळले होते. त्यामुळे त्यावर सरकारने कारवाई करावयास हवी होती. परंतु बाबा रामदेव यांच्यावर सरकारचा वरदहस्त असल्याने त्यांच्यावर कोणतीच कारवाई झाली नाही. 'फेमा'सारख्या कायद्याचा भंग करूनही सरकारने पतंजलिकडे दुर्लक्ष केले. बाबा रामदेव यांच्याविरुद्ध कोविड-१९ च्या ॲलोपॅथी उपचाराविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याबद्दल अनेक राज्यांमध्ये खटले दाखल करण्यात आले आहेत. म्हणजे बाबा रामदेव आणि त्यांची पतंजलि कंपनी वादात अडकण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. याआधीही ते, पतंजलि आयुर्वेद आणि त्यांची उत्पादने वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. २०२२ मध्ये पतंजलिच्या गायीच्या तुपात भेसळ असल्याचे उघडकीस आले होते. उत्तराखंडमधील अन्न सुरक्षा विभागाने ही भेसळ उघडकीस आणली होती. हे तूप भेसळयुक्त आणि आरोग्यास हानीकारक असल्याचे प्रयोगशाळेत आढळून आले होते. बाबा रामदेव यांनी या चाचणीला त्यांच्या कंपनीला बदनाम करण्याचे षडयंत्र असल्याचे म्हटले होते. पतंजलीच्या नूडल्सबाबतही वाद झाला होता. २०२२ मध्ये भाजप नेते आणि खासदार बृजभूषण शरण सिंह यांनी बाबा रामदेव यांना 'भेसळखोरांचा राजा' असे संबोधले होते. उत्तराखंडच्या आयुर्वेदिक आणि युनानी सर्व्हिसेसच्या अधिकाऱ्यांनी पतंजलिच्या दिव्या फार्मसीला नोव्हेंबर २०२२ पर्यंत पाच औषधांचे उत्पादन थांबवण्यास आणि मीडियामधील जाहिराती काढून टाकण्यास सांगितले होते. राज्य प्राधिकरणाने पतंजलि समूहाच्या बीपीग्रिट, मधुग्रिट, थायरोग्रिट, लिपिडॉम आणि इग्रिट गोल्ड या औषधांच्या उत्पादनावर बंदी घातली होती. दिव्या फार्मसीने या औषधात सुधारणा केल्यानंतर या औषधांच्या निर्मितीला पुन्हा हिरवा कंदील दाखवण्यात आला होता.

२०२१ मध्ये बाबा रामदेव यांच्या कोरोनिल औषधाबाबतही वाद झाला होता. हरिद्वार येथे विकसित करण्यात आलेली 'कोरोनिल टॅब्लेट' सात दिवसांत कोरोना बरा करते असा पतंजलिने दावा केला होता. त्याला 'इंडियन मेडिकल असोसिएशन'ने आक्षेप घेतला होता. बाबा रामदेव यांनी मे २०२१ मध्ये ॲलोपॅथी हे 'मूर्ख विज्ञान' असल्याचा आरोप केला होता.

रेमडेसिव्हिर, फेविफ्लू आदी औषधे कोविड-१९ रुग्णांवर उपचार करण्यात अपयशी ठरली आहेत असाही आरोप केला होता. त्यावर रामदेव यांनी आधुनिक औषधे आणि उपचार पद्धतीवर टीका करू नये असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. २०१६ मध्ये पतंजलिच्या मोहरी तेलाच्या जाहिरातीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. पतंजलिच्या कच्छी धनी मोहरी तेलाच्या जाहिराती खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या असल्याचा आरोप खाद्यतेल उद्योग संस्थेने केला होता. २०२२ मध्येही पतंजलिचे मोहरीचे तेल राजस्थानमधील गुणवत्तेच्या मानकांची पूर्तता करत नसल्याचे आढळले होते. २००६ मध्ये मार्क्सवादी नेत्या वृंदा करात यांनी रामदेव यांच्यावर पतंजलिच्या औषधांमध्ये मानव आणि प्राण्यांची हाडे मिसळल्याचा आरोप केला होता. पतंजलिने हे आरोप फेटाळले होते. पतंजलि आवळा रस दर्जेदार नसल्याचे सिद्ध झाल्यानंतर लष्कराने आपल्या कॅन्टीनमधून हा रस काढून टाकला होता. २०१८ मध्ये पतंजलिने व्हॉटस्ॲपशी स्पर्धा करण्यासाठी स्वदेशी मेसेजिंग ॲप 'किंभो' सादर केले होते परंतु काही तासांनंतर ते मागे घेण्यात आले. या ॲपमधील खासगी माहितीच्या सुरक्षेबाबत तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली होती.

एकूण बाबा रामदेव हे व्यक्तिमत्त्व हरहुन्नरी आणि उचापतखोर दिसते. बाबा रामदेव यांना पतंजलिने औषधी उत्पादनांच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या सूचनांचे उल्लंघन केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे. गत दोन सुनावण्यांत त्यांना तसा इशारा देण्यात आला होता, समन्स काढण्याचा इशाराही देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर योगगुरू बाबा रामदेव न्यायालयात हजर होते. एखादे चांगले काम केले म्हणजे अन्य कामे चुकीची करायला परवानगी मिळते असे नाही. बाबा रामदेव यांचे योगातील कार्य सलाम करावे असेच आहे, परंतु याचा अर्थ त्यांच्या पतंजलि आश्रमाला काहीही करायला परवानगी मिळेल असे नाही. हमीचे पालन न केल्यामुळे न्यायालयाने त्यांना माफी मागण्यास सांगितले होते. ही माफी पुरेशा गांभीर्याने मागण्यात न आल्याने न्यायालयाने २ एप्रिलला रामदेव व बाळकृष्ण यांची कानउघाडणी केली होती. अखेर त्यांनी बिनशर्त आणि विनाअट माफी मागितली. बाबा रामदेवांचे हे लोटांगणासन ठरले.

# लोकतंत्रचा वर्धापन दिन उत्साहात: शुभेच्छांचा वर्षाव..!



## पान १वरून...

### धारूर तालुक्यात वादळी

वाजण्याच्या सुमारास अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली . या पावसाच्या दरम्यान आंबेवडगाव , सोनीमोहा , चोंडी , जहांगीरमोहा , धनकवाड , थेटेगव्हाण , चोरांबा , अरणवाडी ,पहाडी पारगाव या गावच्या शिवारामध्ये मोठ्या प्रमाणात गारपिठ झाल्यामुळे अंबा , डाळिंब या फळ पिकासह मोठ्या प्रमाणामध्ये उन्हाळी भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे . अचानक झालेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांची मोठी धावपळ उडाली होती . काढणी केलेल्या ज्वारी , गहू , हरभरा पिके उघड्यावर असल्याने शेतामध्ये पूर्णपणे भिजवून गेले आहे .वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यामुळे शेतातील आणि घरावरील पत्रे उडाल्याने हाहाकार उडाला होता .सोनीमोहा येथे अचानक नात्याला पूर आल्यामुळे काही अंतर ट्रॅक्टर वाहून गेली होते . ते शेतकऱ्यांनी थांबवले.अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या मोडून पडले आहे .पावसादरम्यान झालेल्या विजेच्या धक्क्यामुळे सोनीमोहा येथे दोन शेळ्यांचा मृत्यू झाला . रेशीम साठी उभारण्यात आलेले शेड वरील पत्रही उडून गेले होते . अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत .रेशीम साठी उभारण्यात आलेले शेड वरील पत्र हीउडून गेले होते .पाऊस आत असलेल्या घरांचा मारा पक्षांना लागल्यामुळे पक्षाचा मृत्यू झाल्याची दिसून येत होते .

**अर्धा तास गारपीट**

गुरुवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास पाऊस सुरू झाला होता . यादरम्यान वादळी वारे सुरू होते . .यावेळी अचानक गारपीट सुरू झाली . ही गारपीट अर्धा तास सुरू होती . अचानक झालेला गारपिठीच्या पावसामुळे शेतात उघड्यावर असलेल्या पशुधनांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले होते .

**पंचनामाच्या सूचना**

तालुक्यात अनेक गावांमध्ये झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पिकाचे तसेच घराचे नुकसान झाले आहे . या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश तलाठी , मंडळअधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत .

जीवककुमार कांबळे , तहसीलदार धारूर

------------

### गेवराई तालुक्यात सिरसमार्गला

वेगवान गारपिटीला याठिकाणी सुरूवात झाली. सुमारे तासभर झालेल्या गारपिटीने खूप मोठे नुकसान केले. या सिरसमार्ग परिसरात मोठ्या प्रमाणात मोसंबीच्या बागा आहेत. या मोसंबी बागांचे या गारपिटीत मोठे नुकसान झाले आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणची घरावरचे पत्रे देखील उडून गेले. तसेच आंब्यासह इतर फळबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. घरांच्या भोवती आणि शेतांमध्ये गारांचा खच झाल्याचे येथे दिसून आले.

-----------

### वडवणी तालुक्यात

रोडवर झाडे पडल्याने काही काळ वाहातुक ठप्प झाली होती. तालुक्यातल डोंगर पट्यात मोठ्या प्रमाणात गारा पडल्याने चौफेर गारांचे थर साचले होते.उन्हाळ्यातच नदी ओढ्या नाल्यांना पाणी आले.आचानक आलेल्या पावसामुळे शेतात काम करत आसलेल्या शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.शेतकऱ्यांच्या शेतातील आंबा टरबूज खरबूज उन्हाळी पिक गहू ज्वारी बाजरी कांदा भाजीपाला आदी पीक भुईसपाट झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे काही क्षणात होते च्या नव्हते झाले व हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेहल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे.तालुक्यातील डोंगर पट्ट्यातील चिंचवन कोठारबन पारगाव दहिफळ पिंपळ टक्का रुई पिंपळा सोन्ना खोटा चिखलबीड पिंपळा रुई खडकी देवळा लोणवळ बाबी कुप्पा आदी गावातील शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी शासनाने तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

-------------

### खामगावात वीज पडून

म्हशींचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले. गुरुवार दि.११ रोजी सायंकाळ ५ च्या सुमारास विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने शहर व तालुक्यात हजेरी लावली. या तडाख्यात तालुक्यातील खामगाव येथील शेतकरी शरद प्रल्हाद बडे यांची दुभती म्हैस वीज पडल्याने जागीच मृत्यू झाली. दुभती म्हशीच्या मृत्यूने शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.यापूर्वी मंगळवार दि ९ रोजी परळी तालुक्यातील अस्वलअंबा येथे विज पडून अशोक श्रीपती ढाकणे यांची म्हैस दगावली होती.

-----------------

### सलग तिसऱ्या दिवशी

त्यामुळे यावर्षी अंबाजोगाई तालुक्यासह संपूर्ण केज विधानसभा मतदारसंघातील अनेक पाणी पुरवठा योजनांच्या घशाला कोरड पडली आहे. कमी पावसामुळे गतवर्षीचा खरीप व रब्बी हंगाम धोक्यात आला. म्हणावे तेवढे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले नाही. त्यामुळे यंदा चारा, पाणी टंचाई निर्माण झाली आहे. अशातच यावर्षी उष्णता अधिक जाणवते आहे. यंदा मुबलक प्रमाणात पाऊस पडतो का ते माहीत नाही. अशा वेळी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतातील गहू, ऊन्हाळी सोयाबीन यासह विविध काढणीस आलेली पिके आणि आंबा, द्राक्ष, चिक्कू, टरबूज, खरबूज, केळी या फळ पिकांसाठी अवकाळी पाऊस मारक ठरतो. अंबाजोगाई शहर व तालुक्यात मोठ्या खंडानंतर ऐन उन्हाळ्यात सलग तिसऱ्या दिवशी पडलेल्या अवकाळी पावसाने नागरिकांची मोठी त्रेधा तिरपीट उडाली. हा पाऊस अंबाजोगाई तालुक्यात अनेक ठिकाणी कोसळला असल्याचे समजते. सोसाट्याच्या वाऱ्यासह वीजांचा प्रचंड कडकडाट झाला. अंबाजोगाई शहरानजीक वीज कोसळल्याची माहिती मिळाली आहे. नेमकी कुठे वीज कोसळली याची माहिती बातमी लिहीपर्यंत प्राप्त झाली नाही. चांगल्या पावसामुळे हवेत किंचितसा गारवा निर्माण झाला आहे. असे असले तरी या पावसाने पुढील काळात गर्मी, उष्णता अधिक वाढणार आहे. हे मात्र नक्की. इतर काही नुकसान झाले असल्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सलग तिसऱ्या दिवशी पडलेल्या पावसाने अंबाजोगाई तालुक्यात काढणीस आलेल्या शेती पिकांचे नुकसान झाले आहे

-----------

### पठाण मांडवा परिसरात

तातडीने पावले उचलली. यात काही जणांनी हलगी ही वाजवली. गावातील ग्रामस्थांचा आवाज ऐकून त्या ठिकाणाहून बिबट्यानं पळ काढला, अशी माहिती मिळाली आहे. दरम्यान, साकुड पठाण मांडवा परिसरात बिबट्या दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत वन अधिकारी कस्तुरे यांच्याशी संपर्क साधला असता वन विभागाच्या वतीने परिसरातील ग्रामस्थांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

--------------

### छत्रपती घराण्याचा अपमान

अपमान सहन करणार नाहीत. हा छत्रपती घराण्याचा अपमान आहे. कुठल्याही परिस्थितीत जनता भीक घालणार नाही. खासदार मंडलिक यांनी माफी मागावी', अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. या निवडणुकीची सुरूवात झाली त्यावेळी भाजपचे नेते चंद्रकांत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांनी शाहू महाराजांबद्दल कोणीही वैयक्तिक टीका करणार नसल्याचे स्पष्ट केले होते. तशा सूचना देऊनही संजय मंडलिक आपल्या स्वत:च्या स्वार्थासाठी शाहू महारांजांविरुद्ध विधान करत आहेत. खरेतर त्यांना मतदानापूर्वीच आपला पराभव दिसत आहे. त्यातूनच ते अशा प्रकारचे वक्तव्य करत आहेत, असा टोलाही सतेज पाटील यांनी लगावला.

----------

### डाळींच्या किंमती

१६० रुपये किलोवर गेली आहे. तसेच मूग आणि मसूर डाळींच्या किंमतीच्या बाबतीत देखील अशीच स्थिती आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. अशा स्थितीत डाळींच्या किंमती कमी करण्याचा सरकारकडून प्रयत्न केला जात आहे.

-------------

### लोकतंत्र युट्युब चॅनेल शेतकऱ्यांचा

बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हावा. भविष्यात लोकतंत्र यूट्यूब चनेल शेतकऱ्यांचा आवाज बनून कार्य करेल, अशी अपेक्षा धनंजय मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.

# जगाच्या पोशिंद्यासह गावच्या कारभाऱ्याचा गुणगौरव

## आदर्श सरपंच

## आदर्श शेतकरी






















## गेवराईत सोमवारी ज्येष्ठ नागरिक संघाचा प्रमाणपत्र वितरण सोहळा

गेवराई । प्रतिनिधी

येथील जेष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन राज्य संघटनेला संलग्न राहून जेष्ठ नागरिक संघाची स्थापना केली होती . मात्र त्या संघांना राज्य संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्र मिळाले नव्हते . आता गेवराई येथील नवीन ५ जेष्ठ नागरिक संघ तसेच मन्यारवाडी येथील ४ असे एकूण ९ नव्या संघाना महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबईकडून मान्यता प्राप्त झालेली आहे.

या नूतन संघांचा 'प्रमाणपत्र वितरण समारंभ' सोमवार दि. १५ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे .

गेवराई येथील आर .बी . अट्टल कॉलेजमधील सेमीनार सभागृहात सांय ५ वाजता आणि

मन्यारवाडी येथे सांय .७ वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार



आहे . याप्रसंगी प्रमाणपत्र वितरण दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष डॉ . बी.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल. तसेच प्रमुख अतिथी म्हणून दक्षिण मराठवाडा उपाध्यक्ष प्रा .दामोधर थोरात, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ मामडगे, महिलाध्यक्षा सौ.कमलताई बरुळे आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत . बीड जिल्ह्यात जेष्ठ नागरिक चळवळ मजबूत करणे तसेच ''गाव तिथे संघ'' व ''थोडेशे माय-बापासाठी पण'' हे अभियान मजबूतीने पुढे नेणेसाठी 'बीड जिल्हा जे.ना.संघ समन्वय समितीचा' हा प्रयास आहे.या कार्यक्रमास गेवराई शहर व तालुक्यातील जेष्ठ नागरिक बंधू - भगिनींनी उपस्थित राहावे, असे आवाहन जेष्ठ नागरिक संघाचे गेवराई तालुका समन्वयक प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले आहे .



# समता परिषद आयोजित क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या जयंतीने बीड शहर झाले ज्योतीमय!

**बीड । प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाचे आद्य जनक, गोरगरीब, दिन दलितांचे कैवारी ज्ञानाचा धगधगता सूर्य, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती बीड शहरामध्ये समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा ओबीसीचे राष्ट्रीय नेते माजी उपमुख्यमंत्री आ. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हा अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. सायंकाळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीतील सोलापूर येथील पैलवान डीजेने सर्वांचे मन आकर्षित केले तर तरुणाईचा जल्लोष यावेळी दिसून आला.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक जयंती निमित्त महोत्सव समितीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये जयंतीच्या दिवशी सकाळी नऊ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून समता ज्योत रॅली काढण्यात



आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या समता ज्योत रॅलीचा शुभारंभ समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, परीट समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप धनगर समाजाचे नेते प्रा. अंकुश निर्मळ, अमर ढोणे, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ॲड. संदीप बेदरे, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील साखरे, बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, महोत्सव समितीचे अध्यक्ष तुषार दोडके, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर राऊत , सचिव अजय राऊत, कोषाध्यक्ष कार्तिक गनगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यापर्यंत शहरातील मुख्य रस्त्यांवरून मार्गक्रमण करीत या रॅलीचा समारोप क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. यावेळी शेकडो समता सैनिक, फुले प्रेमी नागरिक उपस्थित होते. गुरुवारी जयंतीदिनी सकाळी नऊ वाजता अभिवादन सभेचे

### समता ज्योत रॅली, अभिवादन सभा आणि मिरवणुकीतील जय ज्योती जय क्रांतीच्या जयघोषाने बीड शहर दणाणले!

आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी फुले प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिवादन सभेस बीड शहरासह तालुक्यातील हजारो समता सैनिक, फुले प्रेमी नागरिक यांची उपस्थिती होती. सायंकाळी सहा वजनाच्या सुमारास सोलापूर येथील पैलवान डीजेच्या लयबद्ध स्वरात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची मिरवणूक मोठ्या जल्लोषात काढण्यात आली. यावेळी ''जय ज्योती जय क्रांती'' च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. मिरवणुकीमध्ये तरुणाईचा जल्लोष मोठ्या प्रमाणात दिसून आला.

**ॲड. सुभाष राऊत यांच्या हस्ते झाला मिरवणुकीचा शुभारंभ**

बीड शहरातील माळीवेस भागातून निघालेल्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मिरवणुकीचा शुभारंभ समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यावेळी दै. मराठवाडा साथीचे बीड जिल्हा प्रतिनिधी ॲड. संदीप बेदरे, रणजीत पाटील, नितीन साखरे, निखिल शिंदे, नितीन राऊत, दिलीप बेदरे, पत्रकार चंद्रकांत साळुंके, पत्रकार प्रचंड सोळंके यांच्यासह समता सैनिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

### जयंतीनिमित्त वेशभूषा स्पर्धा आणि रक्तदान शिबिर संपन्न

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त वेशभूषा स्पर्धा आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वेशभूषा स्पर्धेमध्ये अनेक चिमुकल्या मुला मुलींनी सहभाग नोंदविला. तर समता सैनिकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक कार्यामध्ये आपला सहभाग नोंदविला.

### समता रॅलीतील जय ज्योती जय क्रांतीच्या जयघोषाने बीड शहर दणाणले!

बीड जिल्हा समता परिषदेच्यावतीने आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त सकाळी ०९ : ०० वाजता भव्य समता ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यापर्यंत ही ज्योत गेल्यानंतर या रॅलीचे विसर्जन करण्यात आले. यावेळी उपस्थित समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, परीट समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, प्रा. अंकुश निर्मळ, अमर ढोणे, श्री संत नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ॲड. संदीप बेदरे, सुनील साखरे, निखिल शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, महोत्सव समितीचे अध्यक्ष तुषार दोडके, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर राऊत , सचिव अजय राऊत, कोषाध्यक्ष कार्तिक गनगे यांच्यासह शेकडो समता सैनिक उपस्थित होते.

# कांदा बियाण्याला ३५ हजार रुपये क्विंटलचा भाव

## आणखी दरवाढीची शक्यता!

पुणे : राज्यात यावर्षी तुलनेने पाऊस कमी झाला. अशा परिस्थितीतही कांदा उत्पादन चांगले राहिले. मात्र, याउलट कांदा बियाणेबाबत परिस्थती आहे. यावर्षी राज्यात कांदा बियाणे उत्पादनात मोठ्या शक्यता व्यक्त केली आहे. अशातच आता मागील आठ दिवसांमध्ये कांदा बियाणे दरात दुपटीने वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. कांदा बियाणेसाठी प्रसिद्ध असलेल्या औरंगाबाद जिल्ह्यात सध्या कन्नड बाजार समितीत, यंदा बोहनीच्या कांदा बियाण्याला ३५ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत दर मिळत आहे. ज्यात येत्या काही दिवसांत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यावर्षी कांदा उत्पादन चांगले राहिले असले तरी अनेक शेतकऱ्यांना उन्हाळ्यात पाण्याची कमतरता होती. ज्यामुळे जानेवारी ते एप्रिल या ऐन उन्हाळ्यात अधिकचे कांदा बियाणे उत्पादन घेणे, शक्य झाले नाही. परिणामी, यंदा डोंगळे लागवडीत घट झाली असून, याचा थेट बियाणे उत्पादनावर पाहायला मिळत असून, सध्या कांदा बियाणे दरात दुपटीने वाढ झाली आहे. आठ



दिवसांपूर्वी कांद्याचे बियाणे १५ ते १९ हजार रुपये प्रति क्विंटल विकले जात होते. मात्र, त्यात सध्या ३५ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत वाढ झाली आहे. इतकेच नाही येत्या काळात कांदा बियाण्याचे दर ५० ते ५५ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत वाढण्याची शक्यता असल्याचेही जाणकारांकडून सांगितले जात आहे.

### अशी असते बियाणे निर्मिती प्रक्रिया

शेतकऱ्यांना कांदा बियाण्याचे उत्पादन घेण्यासाठी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या पंधरवड्यात त्यासाठी तयारी करावी लागते. यात उपलब्ध कांद्यामधून उच्च प्रतीचे मातृकंद लागवडीसाठी निवडले जातात. ज्यानंतर त्यांची लागवड केल्यानंतर जवळपास ४ महिन्यांच्या कालावधीनंतर बियाणे परिपक्व होते. मात्र, या संपूर्ण कालावधीत शेतकऱ्यांना कांदा बियाणे पिकाला (डोंगळे) प्रत्येक ५ ते ६ दिवसांनी पाणी द्यावे लागते. यात मधमाशांची भूमिका देखील तितकीच महत्वाची असते. मधमाशा उपलब्ध असतील तर परागीभवनास मदत होऊन, कांदा बियाणे उत्पादनात भरघोस वाढ होण्यास मदत होते.

# मोगरा फुलशेती करा; मिळेल भरघोस नफा

गेल्या काही दिवसांपासून राज्यात फुल शेतीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यातही शेतकरी शेवंती, गुलाब, झेंडू या फुलांकडे अधिक प्रमाणात वळत आहे. काही प्रमाणात मोगऱ्याच्या फुलांची देखील शेतकरी लागवड करत आहे. मात्र, इतर फुलांपेक्षा मोगरा लागवडीचे प्रमाण कमी आहे. मोगऱ्याचे फुल हे दररोज देव पूजेसाठी, सणसमारंभांसाठी तसेच सौंदर्य प्रसाधने उद्योग, केसांचे तेल यामध्ये वापरले जाते. ज्यामुळे मोगऱ्याच्या फुलांना मोठी मागणी असते.

कधी होते लागवड?

शेती तज्ज्ञांनी मोगऱ्याच्या शेतीला व्यावसायिक शेती पीक मानले आहे. मोगऱ्याचे झाड १० ते १५ फूट उंचीपर्यंत वाढते. त्याची सदाहरित पाने दोन ते तीन इंच लांब आणि देठ पातळ असते. मोगऱ्याची फुले पांढरी असून, ती अतिशय सुंदर आणि सुवासिक असते. मोगऱ्याच्या झाडाला मार्च ते जून महिन्यात फुले येतात. मोगऱ्याच्या फुलाचा वापर विशेषत: हार, सजावट आणि देवाच्या पूजेमध्ये केला जातो. मोगऱ्याची लागवड जून ते नोव्हेंबर या कालावधीदरम्यान केव्हाही केली जाऊ शकते.

किती मिळतो दर?

मोगऱ्याच्या फुलांना २५० रुपये प्रति किलोचा भाव सहज मिळतो. तर लग्न किंवा सण-समारंभाच्या काळात ही ४०० रुपये प्रति किलोपर्यंत विकली जातात. मोगऱ्याच्या फुलांचा उपयोग परफ्यूम, साबण, क्रीम, तेल, शॅम्पू आणि डिटर्जंट पावडरमध्ये सुगंधासाठी केला जातो. भारतात याची लागवड प्रामुख्याने पंजाब, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि हरियाणामध्ये केली जाते.

कसे लागते हवामान?

मोगऱ्याच्या लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान उत्तम मानले जाते. त्याचवेळी, त्याच्या काही जाती अगदी थंड हवामानात देखील सहजपणे वाढू शकतात. रोपाच्या वाढीसाठी सर्वात योग्य तापमान २४ अंश सेल्सिअस ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. हिमाचल प्रदेश, हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये नवीन वाणांपासून चांगली कमाई करता येते.

नियमित पाणी देणे आवश्यक

मोगऱ्याच्या झाडांना नियमित पाणी द्यावे लागते. उन्हाळी हंगामात आठवड्यातून किमान दोनदा पाणी द्यावे. मध्यम हवामानात आठवड्यातून एकदाच पाणी देणे पुरेसे असते. मोगऱ्याला हंगाम आणि जमिनीनुसार सिंचन आवश्यक असते.

मोगऱ्याचे रोप लावल्यानंतर नऊ ते दहा महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात होते. तर काही जातींमध्ये वर्षभर झाडांना फुले येतात. बहुतेक प्रजातींमध्ये फुलांचा काळ हा मार्च ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत असतो. सकाळी सूर्याची किरणे फुलांवर पडण्याआधी फुले तोडली तर उत्तम असते. त्यामुळे त्यांचा सुगंध टिकून राहण्यास मदत होते.



# सॉईल हेल्थ कार्ड तयार करण्याची प्रक्रिया एका क्लिकवर!


मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मृगाचा पाऊस पडल्यानंतर, खरीप हंगामाची लगबग सुरु होणार आहे. अशातच शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीपूर्वी माती परीक्षण करणे क्रमप्राप्त असणार आहे. हे माती परीक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने १९ फेब्रुवारी २०१५ पासून सॉईल हेल्थ कार्ड योजना सुरु केली आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना खरीप हंगामापूर्वी आपल्या शेतातील मातीचे परीक्षण करण्यासाठी सॉईल हेल्थ कार्ड काढायचे असल्यास ऑनलाईन प्रक्रिया करावी लागते.

सॉईल हेल्थ कार्डचे फायदे?

सॉईल हेल्थ कार्ड योजना ही शेतकऱ्यांसाठी खूप लाभदायी योजना आहे. अनेक शेतकऱ्यांना पीक घेण्यापूर्वी आपल्या शेतातील मातीमध्ये कोणकोणते घटक आहे. याबाबत माहिती नसते. ज्यामुळे शेतकऱ्यांना विशिष्ट पिकासाठी मातीतील घटक पूरक आहे की नाही याबाबत कल्पना नसते. ज्यामुळे उत्पादनात मोठी घट होते. परिणामी, सॉईल हेल्थ कार्डच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून घेतल्यास, मातीतील गुणवत्तेनुसार त्यांना अधिक उत्पादन मिळवण्यास मदत होते.

कोणती कागदपत्रे लागतात?

शेतकऱ्यांना प्रत्येक तीन वर्षांनी आपल्या जमिनीचे माती परीक्षण करणे गरजेचे असते. ज्यामुळे शेतकऱ्यांना जमिनीत उपलब्ध घटक आणि पिकासाठी आवश्यक घटक यांचा अंदाज येतो. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एक रिपोर्ट कार्ड देखील दिले जाते. ज्याच्या मदतीने शेतकऱ्यांना त्यांना जमिनीची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. त्यामुळे




खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना सॉईल हेल्थ कार्ड तयार करायचे असल्यास, त्यांना आधार कार्ड, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, मोबाईल नंबर आणि ई-मेल आईडी यांची आवश्यकता असते.

कसा कराल अर्ज?

सर्वप्रथम सॉईल हेल्थ कार्डसाठीच्या या अधिकृत वेबसाइटवर जा. यानंतर तुम्हाला होम पेजवर क्लिक करावे लागेल. आणि तुमचे राज्य निवडावे लागेल. तुम्हाला नवीन वापरकर्ता म्हणून स्वत:ची नोंदणी करावी लागेल. त्यानंतर नोंदणी फॉर्म भरावा लागेल. नोंदणी फॉर्ममध्ये विचारलेली सर्व माहिती प्रविष्ट केल्यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे जोडावी लागतील. त्यानंतर सर्व कागपत्रांवरील माहितीनुसार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. नोंदणी केल्यानंतर, तुम्हाला एक युनिक यूआयडी नंबर मिळेल, म्हणजेच युनिक रजिस्ट्रेशन नंबर.

कसे बनेल तुमचे सॉईल हेल्थ कार्ड?

सॉईल हेल्थ कार्ड मिळवण्यासाठीचा अर्ज तुम्हाला पूर्णपणे ऑनलाइन भरावा लागेल. त्यानंतर शेतकरी वेबसाइटवर मातीच्या नमुन्यांची स्थिती तपासू शकतील. त्यांना लॉग इन करण्याची गरज भासणार नाही. शेतकरी त्यानंतर आपल्या गावाचे नाव, उपजिल्हा, जिल्हा, राज्य, नाव आणि माती नोंदणी क्रमांक निवडून मातीची स्थिती तपासू शकतात. सरकारने नोंदणी प्रमाणपत्र दिल्यानंतर शेतकरी त्यांचे मृदा आरोग्य कार्ड इंटरनेटवरून प्रिंट करू शकतात. 'प्रिंट सॉइल हेल्थ कार्ड' टॅबवर क्लिक करून, शेतकरी त्यांचे सॉईल हेल्थ कार्ड इंग्रजी किंवा हिंदी या दोन भाषांमध्ये मिळवू शकतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०६ : ग्रेट ब्रिटनने 'यूनियन जॅक'ला राष्ट्रीय ध्वज म्हणून मान्यता दिली.
१९६१ : रशियाचा युरी गागारिन हा अंतराळात भ्रमण करणारा पहिला मानव बनला. त्याने अंतराळात १०८ मिनिटे भ्रमण करुन पृथ्वीप्रदक्षिणा केली.
१९६१ : सोवियेत संघाचा युरी गागारिन अंतराळात जाणारा प्रथम माणूस झाला.
१९६७ : कैलाश नाथ वांछू यांनी भारताचे १० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७८ : भारतातील मुंबई ते पुणे शहरादरम्यान पहिली डबल डेक्कर रेल्वे धावली.
१९९७ : पूर्व प्राथमिक प्रवेशाकरता पाल्य अथवा पालकांच्या मुलाखती घेण्यास मनाई करण्याची तरतूद असणारे विधेयक विधानसभेत मंजूर
१९९७ : भारतीय पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचा राजीनामा.
१९९८ : गेल्या शतकातील साठच्या दशकात हरितक्रांती घडवून आणण्यात मोलाची कामगिरी बजावणारे सी. सुब्रम्हण्यम यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान
२००९ : झिम्बाब्वेने अधिकृतरीत्या झिम्बाब्वेचे डॉलर हे चलन सोडून दिले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५९९ : जैनांचे २४ वे तीर्थंकर महावीर यांचा जन्म.
१३८२ : मेवाडचा महापराक्रमी राजा संग्रामसिंग ऊर्फ राणा संग चैत्र व. ९
१८७१ : वासुदेव आपटे - आनंद या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक व संपादक.
१८८५ : महोजोदडोची शोध करणारे भारतीय पुरातत्व व संग्रहालय तज्ञ राखलदास बनर्जी यांचा जन्मदिन.
१९१० : पु.भा. भावे (पुरुषोत्तम भास्कर भावे) - मराठीतील प्रतिभासंपन्न लेखक.
१९१४ : कृष्ण गंगाधर दिक्षीत ऊर्फ कवी संजीव - 'सासरमाहेर', 'भाऊबीज', 'चाळ माझ्या पायांत' या चित्रपटांचे त्यांनी कथा, संवाद व गीतलेखन केले होते. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९९५)
१९१७ : विनू मांकड - सलामीचे फलंदाज व डावखुरे मंदगती गोलंदाज (मृत्यू: २१ ऑगस्ट १९७८)
१९३२ : लक्ष्मण कादिरमगार - श्रीलंकेचे परराष्ट्रमंत्री, मुत्सद्दी, वकील व तामिळ नेते (मृत्यू: १२ ऑगस्ट २००५)
१९३७ : साली भारतीय हिंदी चित्रपट क्षेत्रांतील सुप्रसिद्ध गीतकार व अभिनेते गुलशनकुमार मेहता यांचा जन्मदिन.
१९४३ : सुमित्रा महाजन - लोकसभा अध्यक्ष
१९५४ : सफदर हश्मी - मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (मृत्यू: २ जानेवारी १९८९)
१९८१ : तुलसी गॅब्बार्ड, अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहात निवड झालेली पहिली हिंदू व्यक्ती.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत सत्तेचे शासक सुलतान म्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१७२० : बाळाजी विश्वनाथ भट तथा पहिला पेशवा (जन्म: १ जानेवारी १६६२)
१८१७ : चार्ल्स मेसिअर - फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (जन्म: २६ जून १७३०)
१९०६ : महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र 'न्यायरत्न' भट्टाचार्य (जन्म: २२ फेब्रुवारी १८३६)
१९४५ : फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट - अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३० जानेवारी १८८२)
२००१ : भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनीज चे अध्यक्ष देवांग मेहता यांचे ऑस्ट्रेलियात निधन (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२००१ : पै. चंबा मुत्नाळ - हिंदकेसरी
२००१ : स्माईली चे जनक हार्वे बॉल यांचे निधन. (जन्म: १० जुलै १९२१)
२००६ : राजकुमार - कन्नड चित्रपट अभिनेता व गायक (जन्म: २४ एप्रिल १९२९).

# शेणखतापासून बनतोय माशांचा चारा

शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल सांगणार आहोत, ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकता.

मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका : भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच ने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.






बीड : बंधुभाव आणि शांतीचा संदेश देणाऱ्या ईद-उल-फित्र अर्थात 'रमजान ईद' निमित्त बीड येथील ईदगाह मैदान येथे उपस्थित राहून डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.



माजलगाव :- भाजपाचे माजलगाव चे नेते रमेशराव आडसकर यांनी ईद निमित मुस्लीम बांधवांच्या घरी जाऊन सदिच्छा भेटी देत शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष आरुण राऊत, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोकराव तिडके,भाजपा शहराध्यक्ष.अॅड. सुरेशराव दळवे, ईश्वर अप्पा खुर्पे, बाळासाहेब क्षिरसागर व सहकारी उपस्थित होते.



माजलगाव:- विधानसभा मतदारसंघातील मुस्लीम बांधवांना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा देत माजलगाव शहरातील विविध ठिकाणी ईद निमित्ताने भेटी देऊन मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या आ.प्रकाश सोळंके यांनी शुभेच्छा दिल्या. आ.प्रकाश सोळंके यांनी लहान थोरांपर्यंत शुभेच्छा देत रमजान ईद उत्साहात साजरी केली आहे. हा सामाजिक एकोपा, सलोखा कायम असाच नांदत राहो ही भावना यावेळी आ.सोळंके यांनी व्यक्त केली.



चोसाळा : येथील हिंदू मुस्लिम बांधवानी रमजान ईद निमित्ताने तांबोळी बंधू यांच्या निवासस्थानी एकमेकांना भेटून शुभेच्छा दिल्या.

# दिंद्रुड पंचक्रोशीत गरिबांच्या फ्रिजला ग्राहकाची पसंती

## बाजारात माठांचे भाव दीडपटीने वाढले

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिवसेंदिवस उन्हाळ्याची दाहकता वाढत असल्याने गरिबांचा फ्रिज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माठांची मागणी वाढली आहे. मात्र गतवर्षीच्या तुलनेत बाजारात माठांच्या किमतीत जवळपास दीडपटीने वाढ झाली आहे. उत्पादन खर्च जास्त होत असल्यामुळे भाव वाढविल्याशिवाय पर्याय नसल्याचे कोल्हापुरे व देवकर या कुंभार बांधवांनी सांगितले. पंचक्रोशीतील ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेता, आम्ही पुरवठा करण्यास कमी पडत असल्याचेही त्यांनी सांगितले.

उन्हाळ्यात स्वत:ला निरोगी ठेवायचे असेल, तर माठातले पाणी पिणे गरजेचे आहे. कारण फ्रिज मधील पाणी शरीराला अपाय करू शकते, फ्रिजमधले गार पाणी पिऊन अनेक शारीरिक समस्या निर्माण होतात असे जाणकार सांगतात. त्यामुळे उन्हाळ्यात अनेकजण माठातील पाणी पिणे पसंत करतात. माठातले थंडगार पाणी पिऊन तुमची तहान तर भागतेच. शिवाय निरोगी राहण्यासाठीही मदत मिळते. माती ही सर्वात शुद्ध आणि रोग दूर करणारी आहे असे म्हणतात. साहजिकच माठातले पाणी तुम्हाला निरोगी ठेवते. त्यामुळे हे पाणी प्यायल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात.




माठ अथवा मातीची भांडी किंवा वस्तू बनविण्यासाठी विशिष्ट प्रकारची माती लागते. तशा प्रकारची माती सगळीकडे उपलब्ध नसते. दूरवरुन वाहतूक करावी लागत असल्यामुळे त्यासाठी बराच खर्च येतो. तसेच आजघडीला माती भिजवण्यासाठी पाणी सुद्धा विकत घ्यावे लागत असल्याची कैफियत फकीर जवळा येथील विष्णू हनुमंत कोल्हापूरे व संगम येथील नवनाथ नामदेव देवकर या कुंभार बांधवांनी मांडली. आम्ही माठा सोबतच कोथळ्या, रांजण, तुळशी वृंदावन, कोटांबे, चूल, मातीची भांडी, मडके आदी वस्तू बनवत असतो. हा आमचा पिढ्यानपिढ्या चालू असलेला वडिलोपार्जित व्यवसाय असल्याचेही कुंभार बांधवांनी सांगितले. गतवर्षी छोट्या व मोठ्या माठाची अनुक्रमे १०० ते १५० रुपये किंमत होती. मात्र यावर्षी यात दीडपट वाढ झाली असून छोटा माठ १५० रुपयात तर मोठा २५० रुपयात विकला जात आहे. अतिशय कष्टाचे व मेहनतीचे हे काम असून कुशल कामगाराने केलेल्या वस्तूला लोक पसंती देतात. माठ बनविण्यासाठी येणारा खर्च व त्यासाठी करावी लागणारी अपार मेहनत याचा विचार केला तर हा व्यवसाय सर्वार्थाने परवडत नाही. मात्र शेतीवाडी नसल्याने दुसरे काय करणार? असा सवाल उपस्थित करुन आम्हाला कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी हा पारंपरिक व्यवसाय करणे अपरिहार्य असल्याचे विष्णु कोल्हापुरे व देवकर यांनी सांगितले.

आयुर्वेदानुसार माठातील पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत. माठातील पाण्याचे तापमान आदर्श असल्याने ते पचनास मदत करते. पोट फुगणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या टाळते. बर्फाचे थंड पाणी प्यायल्याने आपली पचनक्रिया मंदावते. हे आपल्या पोटातील रक्तवाहिन्या संकुचित करते, ज्यामुळे खूप अस्वस्थता येते. मातीच्या भांड्यात पाणी पिणे, अन्न शिजवणे आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे मानले गेले आहे.

– डॉ. शिवरत्न शेटे
(एम. डी. आयुर्वेद)

## बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे प्रा.ईश्वर मुंडे यांच्या निवासस्थानी

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणूक रंगात येत आहे.प्रमुख पक्षांनी आपले उमेदवार निश्चित केले आहेत.उमेदवार ही आपली रणनिती ठरवत सुसाट सुटले आहेत. गाठी भेटीचा भाग म्हणून बीड लोकसभा निवडणूकीसाठी शरदचंद्र पवार पक्षाकडून संभाव्य ईच्छूक उमेदवार प्रा.ईश्वर मुंडे यांच्या यशवंतराव चव्हाण चौक,अंबाजोगाई येथील आनंदभवन निवासस्थानी महा विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी भेट दिली.

महा विकास अघाडी मध्ये बीड ची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाला सुटणार आसल्यामुळे मागील कांही महीन्यापासून संभाव्य ईच्छूक उमेदवार म्हणून माजी केंद्रीय मंत्री जयसिंग गायकवाड,प्रा.ईश्वर मुंडे,डॉ.नरेंद्र काळे,प्रा.सुशिला मोराळे यांना पक्षाने निवडणूकीच्या कामाला लागा असे सांगितल्यामुळे वरील सर्वांनी जिल्हा भरात जनसंपर्क करून तुतारीचा प्रसार व प्रचार केला होता. परंतू निवडणूक जशी जशी जवळ येत गेली तसे तसे समिकरणे बदलत गेली आणि विजयाची जास्त शक्यता असलेल्या बजरंग सोनवणे यांना पक्षाने उमेदवारी दिली. आपल्या निवासस्थानी आलेल्या बजरंग सोनवणे यांचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी मनस्वी स्वागत करून खा.शरदचंद्र पवार व आ.जयंत पाटील यांनी दिलेल्या उमेदवारीचे स्वागत करून बजरंग सोनवणे यांच्या विजयासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करून त्यांना विजयी करू असे मनोगत या वेळी आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रा.ईश्वर मुंडे यांनी व्यक्त केले. या वेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे,प्रदेश उपाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे,तालुकाध्यक्ष अमर देशमुख,तालुका युवक अध्यक्ष सिध्देश्वर लोमटे,शहराध्यक्ष शहनवाज पठाण,महीला जिल्हा कार्याध्यक्षा संजीवनीताई देशमुख,अंबाजोगाई तालुकाध्यक्षा श्रीदेवी शिंदे,उपाध्यक्षा सुरेखा पवार,तालुका कार्याध्यक्षा पार्वतीताई गडदे यांचे सह बहू संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्ये उपस्थीत होते.





## दिंद्रुड जवळ दुहेरी अपघातात तरुण गंभीर जखमी

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड जवळ बीड परळी महामार्गावर मोटर सायकल व दोन चार चाकी वाहनांचा दुहेरी अपघात बुधवारी सायंकाळी आठ वाजे दरम्यान घडला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून उपचारार्थ हलविण्यात आला.

दिंद्रुडच्या बेलोरा फाटा जवळ हाकेच्या अंतरावर हा अपघात घडला. अल्ताफ रसूल सय्यद वय २५ वर्ष रा जवळा (फ) हा तरूण दिंद्रुड हुन स्वगावी दुचाकी क्र.एम एच ४४ वाय २७३८ ने परतत असताना गंगाखेडहून बीड कडे जाणाऱ्या एका चार चाकी एम एच ४६ बी ए १०९७ या वाहनाला धडक दिली.

याच वेळी पाठीमागून येणाऱ्या चार चाकी एम एच १४ जे एच ००८८ या गाडीवर जखमी तरुणाची मोटरसायकल आदळली. या अपघातात अल्ताफ रसूल सय्यद हा गंभीर जखमी झाला असून तिनही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर घटनास्थळी बघ्यांनी गर्दी केली होती.

## बहीण भावाच्या पवित्र नात्यांना बदनाम करणाऱ्या सुधीर मुनगुंटिवार यांचा निषेध

बीड । प्रतिनिधी

चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचे भाजपचे उमेदवार तथा महाराष्ट्राचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर येथे भारतीय जनता पार्टीच्या प्रचार सभेमध्ये अतिशय गलिच्छ व किळसवाणे वक्तव्य करुन आपल्या विकृत मानसिकतेची व संस्काराची उधळण केलेली आहे. विशेष म्हणजे ही सभा देशाचे माजी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची होती यासभेमध्ये मुनगंटीवार सारखा एक जबाबदार नेता ''अतिशय पवित्र अश्या बहीण भावाच्या नात्यावर गलिच्छ आणि आक्षेपार्ह विधान करतात हे विधान अतिशय चुकीचे असुन बहीण भावाच्या नात्याला काळीमा फासणारे आहे. बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने यावक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त करून अश्या निच प्रवृत्तीला पाठीशी घालणाऱ्या भारतीय जनता पक्षाला देशातील जनताच मतदानातुन उत्तर देईल असे सुचक विधान काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते वारंवार देशवासीयांच्या भावना दुखावून अपमान करण्याचे काम करत आहेत. यापूर्वी देखील प्रशांत परिचारक यांनी अश्याच प्रकारे चुकीचे वक्तव्य देशरक्षणासाठी सीमेवर काम करणाऱ्या जवानांबद्दल केले होते, मंगलप्रभात लोढा असेल किंवा माजी राज्यपाल भगतसिंग कोषारी असतील यांनी देखील यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द वापरून शिवप्रेमींच्या भावना दुखावण्याचे काम केलेले होते अखंड हिंदुस्थानचे दैवत असलेले शंभू महादेव आपल्याकडे महादेवाला शंभु म्हणतात त्याच बरोबर छत्रपती संभाजी महाराजांना देखील शंभूराजे म्हणतात त्यातच भाजपचा श्रीकांत भारती नावाचा आमदार कुत्र्याला शंभु नावाची उपमा देवुन समस्त शिवप्रेमिंच्या भावना दुखावण्याचा काम करतात. आमच्याकडे येणाऱ्या नेत्यांची आम्ही साफसफाई करून घेतो अश्या प्रकारचे चुकीचे विधान आपण वारंवार पाहत आहोत. कुठलाही विकासाचा मुद्दा नाही, बेरोजगारांसाठी रोजगाराचे व्हिजन नाही, शेतकरी, कष्टकरी सर्वसामान्य नागरिक बेहाल झालेली असताना सत्तेच्या मस्तीत मस्तवाल झालेले या नेत्यांची मस्ती उतरवण्याचे काम देशातील जनता येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत मतदानातुन करेल असे गणेश बजगुडे पाटील म्हणाले.



## साधी पिठाची चक्की आणू शकले नाहीत, ते जिल्ह्याचा विकास काय करणार- परदेशी

बीड । प्रतिनिधी

अनेक वर्षापासून एकाच घराण्यात जिल्ह्याची सत्ता असताना जिल्ह्यात साधी नवीन पिठाची चक्की सुद्धा आणली नाही. ते पिठाची चक्की सुद्धा चालवू शकले नसून जिल्ह्याच्या विकासात अपयशी ठरले आहेत. असा हल्लाबोल उबाठा शिवसेनेचे अंबाजोगाई विधानसभा प्रमुख मदन परदेशी यांनी करीत आता जिल्ह्याच्या विकासाच्या नावाने थापा मारीत पुन्हा आम्हाला विकासासाठी निवडून द्या म्हणत आहेत. मात्र त्यांच्या भूलथापांना बळी पडू नका. असे आवाहन ही परदेशी यांनी केले.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई तालुक्यातील तटबोरगाव येथे कॉर्नर सभेत उबाठा शिवसेनेचे अंबाजोगाई विधानसभा प्रमुख मदन परदेशी हे बोलत होते. यावेळी उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, तानाजी लांडगे, सुधाकर शिंदे, व्यंकटेश चामानर, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालसाहेब जाधव हे उपस्थित होते. यावेळी गावकऱ्यांनी गावातून मिरवणूक काढीत त्यांचे उत्साहात स्वागत केले. पुढे बोलताना मदन परदेशी यांनी भाजपच्या खासदार व आमदारांवर सरकून टीका करीत ज्यांच्याकडे मागील सलग पंधरा वर्षांपासून सत्ता आहे. मात्र त्यांनी आजपर्यंत जिल्ह्यात कुठलाही विकासाचा व रोजगार निर्मितीचा प्रकल्प आणलेला नाही. ते साधी पिठाची चक्की सुद्धा चालू शकले नाहीत, तर ते जिल्ह्याचा विकास काय करतील ? असा सवाल उपस्थित करीत विकासाच्या नावाने थापा मारून व भूलथापा मारत मते मागत फिरण्याची त्यांच्यावर दुर्दैवी वेळ आली आहे. अशी उपरोधक टीका ही त्यांनी केली. अंबाजोगाई तालुक्यातील कोदरी, लोखंडी सावरगाव, चनई, हिवरा, सोमनाथ बोरगाव, धानोरा येथे गावभेटी देत गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.




## धारूर शहरात मोठ्या उत्साहात रमजान ईद साजरी

### रमजान ईद निमित्त हिंदू मुस्लिम एकोप्याचे दर्शन



धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरात सर्व जाती धर्माचे सन उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करण्याची परंपरा आज ही कायम आहे. अल्लाह ने रमजान महिन्यात संपूर्ण कुरान या जमिनीवर उतरविले. कुरान च्या माध्यमातून समस्त मानव जाती साठी एकता, भाईचारा व शांततेचं संदेश दिला गेला आहे. आपण नशीबवान आहोत की अल्लाह ने आमच्यासाठी आजचा दिवस ईद च्या माध्यमातून दिला ज्यामुळे कोणीही ना गरीब आहे ना कोणी अमीर; सर्व ईद दिवशी एकाच वेळी एकाच लाईन मध्ये सर्वसमान कोणताही भेदभाव न ठेवता अल्लाह साठी नतमस्तक होतात. जगात शांतता व अखंडता कायम रहावि यासाठी अल्लाह कडे दुआ करण्यात आली .

मुस्लिम धर्मात पवित्र असणारा रमजान ईद निमित्त महिनाभर मुस्लिम बांधव उपवास करतात व रमजान ईद दिवशी सर्व मुस्लिम समाज बांधव एकत्र येत ईदगाह मैदानावर समूहिक नमाज पठण करून एकमेकांना ईद च्या शुभेच्छा देतात. धारूर शहरात मोठ्या उत्साहात रमजान ईद करण्यात आली शहरातील मुस्लिम बांधवानी एकत्र येत ईदगाह मैदानावर एकत्र जमून समूहिक नमाज पठन केले याठिकाणी मुस्लिम बांधवाना ईद निमित्त शुभेच्छा देण्यासाठी शहरातील समाजिक कार्यकर्ते विविध राजकीय पक्षाचे नेते यांनी मुस्लिम बांधवाना ईद निमित्त शुभेच्छा दिल्या. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोक पोलीस बंदोबस्त होता.

दरवर्षी रमजान ईद निमित्त शहरातील हिंदू बांधवासाठी फराळ चे आयोजन केले जाते ,हिंदू बांधव घरी येऊन आम्हला ईद च्या शुभेच्छा देतात हिंदू मुस्लिम एकत्र येत दरवर्षी ईद साजरी करतोत.

ॲडवोकेट शेख शहादाब

## प्रसारमाध्यमांनी संविधान निष्ठा जपायला हवी – प्रशांत लाटकर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

व्यक्ती स्वातंत्र्यातच अभिव्यक्तीचे स्वातंत्र्यही समाविष्ट आहे. जे अधिकार व्यक्तीला आहे तेच प्रसार माध्यमांनाही आहे. व्यक्तीनिष्ठ , भेदभाव पूरक व असत्य कथन करणारी पत्रकारीता ही निकृष्ट दर्जाची समजली जाते. तर सत्यशोधन करणारी , शासनाला जाब विचारणारी ध्येयनिष्ठ पत्रकारीता ही कल्याणकारी समजली जाते. पण आज भांडवलदारी व्यवस्थेने प्रसार माध्यमांवर काही प्रमाणात ताबा मिळवलेला आहे. त्या माध्यमातून अनेक प्रकारचे निर्बंध लादले जात आहेत. विविधता जपण्याऐवजी सर्वांना एकाच रंगात रंगविण्याचे कार्य होतांना दिसत आहे. बातम्या वस्तुनिष्ठ स्वरूपात स्विकारण्या ऐवजी त्या बऱ्याचदा मोडून तोडून प्रसारित केल्या जात आहेत. समस्यांना व सत्याला बगल देण्याची वृत्ती वाढली आहे. त्यातून माध्यामांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत आहे. परंतु सामाजिक माध्यमे मात्र सत्यशोधकाची भूमिका बाजावत आहेत. संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या देणगीचा ते पुरेपूर उपयोग करत आहेत.




लोकहित आणि लोककल्याण हेच पत्रकारितेचे ब्रीद असले पाहिजे ! राष्ट्रहिताला प्रधान्य देणारी पत्रकारिता सशक्त झाली पाहिजे. संविधानाला जपणारी पत्रकारिता धष्टपुष्ट झाली पाहिजे. यासाठी प्रसार माध्यमांनी संविधाननिष्ठा जपावी ! असे विचार प्रशांत लाटकर यांनी व्यक्त केले आहेत. ते संघर्षभूमी येथे आयोजित १४ दिवशीय भीमजयंती महोत्सव कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ गणेश सुर्यवंशी हे होते. या कार्यक्रमाची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. नंतर सामूहिक वंदना व संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन घेण्यात आले. या भीमजयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित संविधान जागृतीपर व्याख्यानमालेच्या पाचव्या दिवशी प्रशांत लाटकर यांनी ' भारताच्या संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसार माध्यमांची जबाबदारी ' या विषयावर विचार व्यक्त केले. याप्रसंगी पुढे बोलतांना प्रशांत लाटकर म्हणाले की - स्वातंत्र्या पासून ते १९९० पर्यंतच्या काळातील प्रमुख प्रसार माध्यमे म्हणजे वृत्तपत्र तसेच आकाशवाणी आणि दूरदर्शन ही होती. या काळामध्ये ध्येयनिष्ठ , समाजाभिमुख आणि समाजाचे प्रश्न मांडणारी पत्रकारिता विकसित झाल्याचे आपल्याला दिसते. परंतु १९९० च्या नंतर मात्र देशात अशा प्रकारच्या पत्रकारितेला ओहोटी लागल्याचे दिसते. २०१० नंतर तर ती अधिकाधिक क्षीण होत गेली. माध्यमांनी राष्ट्रीय सुरक्षितता , आंतरराष्ट्रीय संबंध , देशाची एकात्मता आणि राष्ट्रीय सुरक्षितता या बाबींचे कृतीशील भान ठेवले पाहिजे. तसेच आपली भूमिका व जबाबदारी प्रमाणिकपणे पार पाडली पाहिजे. देशात आज एकतर्फी राजकीय भूमिका घेणारी व धार्मिक भूमिका घेणारी पत्रकारिता होतांना दिसत आहे. ही बाब गंभीर व चिंतनीय आहे. नागरिकांनी पत्रकारितेचे हे एकांगी स्वरूप बदलवण्यासाठी सजग राहणे आवश्यक आहे. असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ गणेश सुर्यवंशी म्हणाले की प्रसार माध्यमे हा लोकशाहीचा मजबूत असा आधारस्तंभ आहे. लोकशाहीचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही माध्यमांकडे आहे. एकाअर्थाने माध्यमे ही जनमताच आरसा आहेत. लोकांचे प्रश्न मांडणारी पत्रकारिता दिनबंधुच्या माध्यमातून क्रांतीसुर्य जोतीराव फुले यांनी केली. तर मूकनायकच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनीही केली. वृत्तपत्र हे बदलाचे क्रांतिकारी माध्यम आहे हे त्यांनी दाखवून दिले. आज लोकांचे प्रश्न मांडणारी प्रखर भूमिका घेतांना माध्यमे दिसत नाहीत. शासनाच्या स्थापनेमध्येही आज माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरतांना दिसत आहे. माध्यमे जर आपली जबाबदारी पार पाडत असतील तरच देश विकसित होईल. आणि माध्यमांनी जर आपली जबाबदारी पार पाडली नाही तर देश संकटात येईल ! असे विचार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि प्रास्ताविक ॲड संदीप थोरात यांनी केले. तर आभार प्रदर्शन पंकज भटकर यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक वंदना व उद्देशिका वाचनाने झाली. तर समारोप राष्ट्रगीताने झाला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड शाम तांगडे , गुलाबराव गायकवाड , संजय हतागळे , बाबुराव मस्के , विश्वनाथ सावंत , डॉ किर्तीराज लोणारे , भारत सातपुते , वामन वाघचौरे , चंद्रमणी गोवंदे , संजय आचार्य , पांडुरंग लांडगे आदींनी विशेष प्रयत्न केले.

cmyk

# असा रंगला लोकतंत्रचा वर्धापनदिन सोहळा




































लढा दुष्काळाशी फाऊंडेशन बीड

शुभेच्छुक : राज पाटील सरपंच तिगाव


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# राज्यात सर्वाधिक मतदार पुण्यात; चार जिल्ह्यांमध्ये महिला मतदार सर्वाधिक

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघातील सुमारे सव्वा नऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संख्येच्या बाबतीत राज्यात पुणे जिल्हा आघाडीवर असून तेथे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वात जास्त मतदार आहेत. नंदुरबार, गोंदिया, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग अशा चार जिल्हयांमध्ये पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे.

पुण्यात ८२ लाखांहून अधिक मतदार

पुण्याची एकूण मतदार संख्या ८२ लाख ८२ हजार ३६३ आहे. तर मुंबई उपनगरची एकूण मतदार संख्या ७३ लाख ५६ हजार ५९६ इतकी आहे. ठाण्याची एकूण मतदार संख्या ६५ लाख ७९ हजार ५८८, नाशिक जिल्ह्यातील एकूण मतदार संख्या ४८ लाख ०८ हजार ४९९ इतकी आहे. तर नागपूरची एकूण मतदार संख्या ४२ लाख ७२ हजार ३६६ इतकी आहे.

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्गात महिला मतदारांची संख्या अधिक

चार जिल्ह्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदार सर्वाधिक आहेत. रत्नागिरीची एकूण मतदार संख्या १३ लाख ०३ हजार ९३९असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३१ हजार ०१२ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ७२ हजार ९१६ इतकी आहे. नंदुरबारची एकूण मतदार संख्या १२ लाख ७६ हजार ९४१ असून यामध्ये १२ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३७ हजार ६०९ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ३९ हजार ३२० इतकी आहे. गोदिंया जिल्हयातही महिला मतदारांची संख्या जास्त आहे. गोंदियाची एकूण मतदार संख्या १० लाख ९२ हजार ५४६असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ५ लाख ४१ हजार २७२ आहे तर महिला मतदारांची संख्या ५ लाख ५१ हजार २६४ इतकी आहे. सिंधुदुर्गची एकूण मतदार संख्या ६ लाख ६२ हजार ७४५असून यामध्ये १ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३ लाख ३० हजार ७१९ आहे तर महिला मतदारांची संख्या ३ लाख ३२ हजार ०२५ इतकी आहे.

राज्यात १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे अशा पाच टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा तयारीला लागली आहे. राज्यात ८ एप्रिल २०२४ पर्यंत एकूण ९ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदारांची नोंद आहे. यामध्ये ४ कोटी ८० लाख ८१ हजार ६३८ पुरुष मतदार तर ४ कोटी ४४ लाख ०४ हजार ५५१ महिला मतदार आणि ५ हजार ६१७ तृतीयपंथी मतदार आहेत.

५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. अहमदनगरमध्ये एकूण मतदार ३६ लाख ४७ हजार २५२ आहेत. सोलापूरमध्ये एकूण मतदार ३६ लाख ४७ हजार १४१ आहेत. जळगावमध्ये एकूण मतदार ३५ लाख २२ हजार २८९ आहेत. कोल्हापूरमध्ये एकूण मतदार ३१ लाख ७२ हजार ७९७ आहेत. छत्रपती संभाजीनगर मध्ये एकूण मतदार ३० लाख ४८ हजार ४४५ आहेत. बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

# निरेच्या पाण्यात माशांची तडफड : प्रदूषणात मोठी वाढ

सोमेश्वरनगर : निरा नदीला प्रदूषणाचा विळखा पडला असून दुर्गंधीयुक्त आणि रासायनिक पाण्यामुळे बारामतीसह अन्य तालुक्यातील शेतीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. निंबूत ते सांगवीदरम्यान नदीपात्रातील संपूर्ण पाणी खराब झाले आहे. निंबूत, मुरूम, होळ, कोर्हाळे, लाटे, सांगवी या परिसरात असलेल्या बंधार्यात दुर्गंधीयुक्त पाणी आहे.



निरा नदीचे पाणी दूषित झाल्याने नदीतील लाखो माशांचे जीव वाचविण्यासाठी तडफड सुरू आहे. दूषित पाण्याने माशांचा मोठ्या प्रमाणावर जीव जात असून, नदीलगत मासे मृतावस्थेत आढळून येत आहेत.

मुरूम व होळ येथे निरा नदीचे दृश्य पाहिले असता या ठिकाणी नदीतील पाण्याला रासायनिक काळा रंग आला आहे. होळ येथील बंधार्याच्या वरील बाजूस मुरुमाचा बंधारा आहे. तर होळ, कोर्हाळे खुर्द बाजूकडील पाणी अस्वच्छ व दूषित आहे. या भागाचा खालचा भाग म्हणजे कांबळेश्वर, सांगवी, शिरवली, खांडज, निरावागज येथेही हीच परिस्थिती आहे. दूषित पाण्याबाबत कायम फलटण तालुक्यातील कत्तलखाने, दूध कंपन्यांकडे बोट दाखविले जाते. परंतु, आता वरच्या भागातील होळ परिसरातील या स्थितीला नेमके कोणती कंपनी, कारखाने जबाबदार आहेत, असा सवाल सर्वसामान्य शेतकरी उपस्थित करीत आहेत. निरेतील दूषित पाण्यामुळे लाखो माशांचा जीव धोक्यात आला आहे. त्यामुळे अस्वस्थता आहे. परंतु, याकडे कोणत्याही सरकारी यंत्रणेला लक्ष द्यायला वेळ नसल्याची स्थिती बारामती तालुक्यात पाहायला मिळते आहे.

येथे दूषित पाण्याने जे मासे तडफडत आहेत, त्यांचा जीव वाचणे सहजशक्य आहे. त्यासाठी सामाजिक संस्था, संघटनांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे. सरकारी पातळीवरून सूत्रे हलणे आवश्यक आहे. एकेकाळी पिण्यासाठी आणि शेतीच्या पाण्यासाठी योग्य असलेले निरेचे पाणी प्रदूषणामुळे खराब होत असताना सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान या विषयावर कोणीही बोलण्यास तयार नाही. रासायनिक पाण्यामुळे निरा नदीतील माशांचे सेवन करणे आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे. यातून आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. दरम्यान निरेच्या प्रदूषणाबाबत सगळेच कारखाने, कंपन्या कानावर हात ठेवत असल्याने या प्रदूषणाला नेमके जबाबदार कोण ? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# पिंपरी चिंचवड विद्यापीठात 'अनंतम २०२४' सांस्कृतिक महोत्सव साजरा

## 'नाच गं घुमा' या चित्रपटातील कलाकारांची उपस्थिती

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयु) 'अनंतम २०२४' या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.



पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमास उपस्थित असलेल्या 'नाच गं घुमा' या चित्रपटातील कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयुच्या प्रभारी कुलगुरू डॉ. मणीमाला पुरी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. 'नाच गं घुमा' चित्रपटातील कलाकार स्वप्नील जोशी, सुकन्या कुलकर्णी, शर्मिष्ठा राऊत, मायरा वैकुल, अलाहाबाद येथील इंडियन इंस्टिटयूट ऑफ इंफॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. मुकुल सुताने आदी उपस्थित होते.

'अनंतम -२०२४' मध्ये कुलदीप सिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चित्तथरारक 'बाईक शो' प्रस्तुत केला तसेच प्रसिद्ध बँड 'एमएच ४३' यांच्या संगीताच्या तालावर तरुणाई थिरकली, तर फॅशन शोला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. अंजू बाला यांनी केले.

# पुण्यात तयार केली तब्बल 'दहा हजार किलो' मिसळ!

**पुणे । प्रतिनिधी**

तब्बल १५ बाय १५ फूट आणि ६.५ फूट उंच अशा तब्बल २५०० किलो वजनाच्या भव्य कढईमध्ये पुण्यात १० हजार किलो मिसळ तयार करण्यात आली. क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी हा उपक्रम गंज पेठेतील महात्मा जोतीबा फुले वाडा येथे राबविण्यात आला.

अयोध्येत तब्बल ७ हजार किलोचा विश्वविक्रमी शिरा साकारण्याकरिता वापरलेल्या कढईत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ विष्णू मनोहर यांनी ही १० हजार किलो मिसळ तयार केली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, मुरलीधर मोहोळ, बाळासाहेब शिवरकर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या उपक्रमाला भेट देत एकत्रितपणे मिसळीचा आस्वादही घेतला. प्रल्हाद गवळी, श्रीधर चव्हाण, नंदा पंडित, सारंग सराफ, रवी चौधरी, सुशीला नेटके, विजय रजपूत, एकनाथ ढोले, बाळासाहेब अमराळे, सुनीता काळे, संतोष पंडित, पीयूष शहा, रुपेश चांदेकर, महेंद्र मारणे आदींनी आयोजनात सहभाग घेतला.




## महात्मा फुले जयंती दिन थाटात साजरा

उपक्रमामध्ये १० हजार किलो मिसळ बनविण्यासाठी मटकी १००० किलो, कांदा ८०० किलो, आलं २०० किलो, लसूण २०० किलो, तेल ७०० किलो, मिसळ मसाला १४० किलो, लाल मिरची पावडर ४० किलो, हळद पावडर ४० किलो, मीठ ५० किलो, खोबरा कीस १४० किलो, तमाल पत्र ७ किलो, फरसाण २५०० किलो, पाणी १०००० लिटर, कोथिंबीर १२५ जुडी, लिंबू १००० नग इत्यादी साहित्य वापरण्यात आले. तसेच मिसळ खाण्याकरिता डिस्पोजेबल डिश ५० हजार, पाणी पिण्यासाठी डिस्पोजेबल ग्लास ५० हजार यांसह स्लाईड ब्रेड १.५ लाख नग असे साहित्य वापरण्यात आले.

क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही महामानवांनी लोकसहभागातूनच मोठी क्रांती घडवली आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत त्यांच्या जयंती निमित्त पुणेकरांच्या सहभागातून ही दहा हजार किलोची मिसळ बनविण्यात आली. दिनांक १४ एप्रिल रोजी पुणे रेल्वे स्टेशन रस्ता येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे देखील १० हजार किलो मिसळ व ताक तयार करुन अभिवादनाकरीता येणाऱ्या बांधवांना वाटप करण्यात येणार आहे. १४ एप्रिल रोजी सकाळी ७ पासून हे वाटप केले जाईल.

# मावळ विधानसभा मतदारसंघातील साडेतीन हजार अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**पुणे । प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदार संघाअंतर्गत मावळ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर नियुक्त ३ हजार ५०० क्षेत्रीय अधिकारी, समन्वय अधिकारी, मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे केंद्रप्रमुख व सहाय्यक अधिकारी कर्मचारी यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत तळेगाव येथील नूतन कॉलेज ऑफ इंजीनियरिंगच्या सभागृहात प्रशिक्षण देण्यात आले.



यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले, मावळचे तहसीलदार विक्रम देशमुख, निवासी नायब तहसीलदार तथा प्रशिक्षण विभाग प्रमुख गणेश तळेकर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

दोन दिवसीय प्रशिक्षण सत्राच्या पहिल्या दिवशी मार्गदर्शन करताना श्री. नवले यांनी अधिकारी व कर्मचारी यांची मतदानाच्या आदल्या दिवशी व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीचे कर्तव्य व अधिकार याबाबत माहिती दिली. कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत मार्गदर्शन करतांना निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कर्तव्य करतांना प्रत्येक अधिकाऱ्याने गोपनीयतेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. कोणीही प्रशिक्षण व प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक टाळू नये. मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष व खुल्या वातावरणात पार पाडण्यात येऊन मतदान करणाऱ्या मतदाराला केंद्रस्थानी मानून आपले राष्ट्रीय कर्तव्य प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावे, असे आवाहन श्री.नवले केले.

श्री. देशमुख यांनी मतदान यंत्राबाबत माहिती दिली. प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदान यंत्रे स्वतः हाताळावीत. प्रशिक्षणार्थींनी प्रात्यक्षिकाच्या आधारे मतदान प्रक्रियेची माहिती करून घ्यावी, यामुळे प्रत्यक्ष मतदानावेळी चुका होणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. यावेळी श्री.नवले यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून शंकांचे निरसन केले.



**पिंपरी चिंचवड डव्होकेट्स असोसिएशनच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९७ वी जयंती नेहरूनगर येथिल कोर्टात साजरी करण्यात आली. या वेळी पिंपरी न्यायालयाचे न्यायाधीश श्री.ए.एम.बगे साहेब, मा. अध्यक्ष ड.नाना रसाळ, अध्यक्ष ड.प्रमिला गाडे यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. न्यायालयाच्या सरकारी अभियोक्ता साधना बोरकर, मा.अध्यक्ष ड.सुनील कडुस्कर, उपाध्यक्ष ड.गोरख कुंभार, ड.नितीन कांबळे, ड.संभाजी वाघमारे, ड.सुनील माने, ड.उमेश गवळी, यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनप्रवासावर कथन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी ड. बी. के.कांबळे, ड.नितीन कांबळे, ड.सागर अडागळे , ड.प्रशांत भडकुंभे, ड.प्रविण जगताप,ड.विजय फडतरे, ड.उमेश गवळी, असोसिएशन चे सहसचिव अड.श्रीराम गालफाडे, सदस्य ड.जयेश वाघचौरे, ड.सुर्यकांत शिंदे ड. राहुल बावीस्कर,ड.विनोद आढाव आदी वकील बांधव उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचान असोसिएशन चे सदस्य ड. विशाल पौळ यांनी केले व आभार प्रदर्शन ड.तेजस चवरे यांनी केले.**

# यवत ग्रामीण रुग्णालयात सावळा गोंधळ : डॉक्टर कोण हेच कळेना

केडगाव : यवत ग्रामीण रुग्णालयात रुग्ण मोठ्या प्रमाणात येतात; मात्र कोण डॉक्टर उपचार करतोय, ते नावदेखील कळत नाही. रुग्णालयातील प्रमुख डॉक्टर फोन बंद करून बसतात आणि काही तर फोन घेतच नाहीत. अशा पद्धतीने यवत रुग्णालयात सावळागोंधळ सुरू असून यावर अंकुश लावण्याची मागणी ऐरणीवर आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, यवत या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय आहे. त्याचा लाभ परिसरातील वाड्या-वस्त्यावरील गोरगरीब नागरिकांना मिळतो. आरोग्य ही महत्त्वाची सेवा असल्याने डॉक्टरांची उपलब्धता असणे गरजेचे आहे.




सध्या या रुग्णालयात किती डॉक्टर आहेत याचा माहिती फलक नाही, कोण सेवेत आहे आणि कोण रजेवर आहे, हेदेखील कळत नाही. काही नवीन आलेले डॉक्टर ओळखीचे नसल्याने रुग्ण आणि डॉक्टर यांच्यात गैरसमजुतीमुळे शाब्दिक चकमक होत आहे. रात्रीच्या वेळी नक्की कोण सेवा देणार, याचा शोध घेताना रुग्णाचा मोठा गोंधळ होतो. या सर्वांचा प्रमुख कोण हेच समजत नसल्याने तक्रार कोणाची आणि कोणाकडे करायची हा मोठा प्रश्न रुग्णांपुढे आहे. दरम्यान सध्या येथे नव्याने एक डॉक्टर रुजू झाल्याचे कळते. त्यांचा फोन नंबर ९९२१६६१६११ हा असून ते फोन उचलत नाहीत. त्यामुळे नक्की हे डॉक्टर कुठे असतात हेच समजत नाही. शासनाच्या पगारावर काम करणारी येथील सर्वच यंत्रणा येणार्या रुग्णांवर उपकार करीत आहे, असेच वर्तन करताना दिसते. या सर्व प्रकाराला आळा घालणारी यंत्रणा नक्की कुठे आहे हे समजणे देखील अवघड आहे. या रुग्णालयाच्या आवारामध्ये येथील डॉक्टरांचे नाव, मोबाईल नंबर तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकार्यांचे नाव, मोबाईल नंबर आणि पत्ता फलकावर लावावा, अशी मागणी त्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांकडून होत आहे

# लग्नात मर्सिडीज न दिल्याने विवाहितेचा छळ

**पुणे । प्रतिनिधी**

लग्नात मर्सिडीज गाडी भेट दिली नाही या काराणावरून तसेच व्यवसायासाठी माहेराहून पैसे आणावेत याकरिता विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी सासरच्या व्यक्तींवर भादवि ४९८ (अ), ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार सप्टेंबर २०१५ ते २२ मार्च २०२४ या कालावधीत लोणावळा येथे तसेच बाणेर येथे घडला.

पती योगेश नामदेव चव्हाण (वय ४०), सासू विमल नामदेव चव्हाण (वय ६५), सासरे नामदेव रामभाऊ चव्हाण (वय ७०), दीर उज्वल नामदेव चव्हाण (वय ४६), सुहास नामदेव चव्हाण (वय ४४, सर्व रा. श्रयसाफल्य, आदर्श कॉलनी, लोणावळा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी ३४ वर्षीय विवाहितेने फिर्याद दिली आहे. ही महिला गृहीणी असून औंध येथे राहण्यास आहे. त्यांना एक मुलगी आहे. चतु:शृंगी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेचे आणि योगेश यांचे २०१५ साली लग्न झाले होते. त्यांचे लग्न ठरल्यानंतर जेव्हा जेव्हा योगेश त्यांना भेटायचा त्यावेळी लग्नात आईवडीलांकडून मर्सिडीज गाडी घेऊन येण्यासाठी दबाव टाकायचा. तसेच, लग्न मेरियट हॉटेलमध्ये लावून द्यावे अशी गळ घालायचा. या दोन्ही मागण्या पूर्ण करा अन्यथा लग्नच करणार नाही अशी धमकी देत होता.

मात्र, लग्नात फिर्यादीच्या आईवडिलांकडून या मागण्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. फिर्यादीच्या वडिलांनी लग्नात मर्सिडीज गाडी दिली नाही यावरून लग्नानंतर सासरच्या व्यक्तींनी त्रास देण्यास सुरुवात केली. फिर्यादीला वारंवार 'तुझ्या आईवडिलांनी काही शिकवले नाही. फिर्यादीला मोठ्या माणसांचा मान राखता येत नाही.' असे म्हणत सतत टोमणे मारण्यास सुरुवात केली. दरम्यान, फिर्यादीचे पती योगेश हे नोकरी करीत होते. त्यांनी नोकरी सोडून व्यवासे करायचे ठरवले. त्यांनी व्यवसाय सुरू केला. पुन्हा नोकरी केली. अशी कामाची धरसोड सुरू होती असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यासोबतच फिर्यादीच्या पतीने व्यवसायासाठी माहेराहून आईवडिलांकडून पैसे घेऊन येण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली.

माहेराहून पैसे आणले नाहीत तर सासरी राहायचे नाही अशी धमकी दिली. वारंवार फिर्यादीच्या अंगावर जाऊन शिवीगाळ करून त्रास दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आलेले आहे. यासोबतच सासू, सासरे, तसेच दीर यांना या बाबत फिर्यादी यांनी सांगितले. त्यावेळी दीर, सासू, सासरे यांनी 'जसे मुलगा जसे म्हणेल तसे वागावे लागेल. नाहीतर निघून जा.' असे धमकी दिली. तसेच, त्यांच्या दिरांनी फिर्यादीच्या पतीला भडकावले. त्यानंतर पतीने फिर्यादीला अधिकच शारिरीक, मानसिक आर्थिक त्रास दिला. तसेच फिर्यादी यांची मुलगी त्यांना भेटायला आली होती. ही मुलगी जर परत पाठवली नाही तर फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना संपविण्याची धमकी दिली. तसेच त्यांचा वारंवार शारिरीक मानसिक छळ केल्याचे आणि फिर्यादीच्या भावाला फोनवरुन शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत चतु:शृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अजय कुलकर्णी म्हणाले की, विवाहितेच्या तक्रारीवरुन आम्ही गुन्हा दाखल करून घेतला आहे. या गुन्ह्याचा तपास सुरू असल्याचे ते म्हणाले. पुढील तपास सहायक निरीक्षक सुजाता शानमे करीत आहेत

# राजघराण्यात मूल दत्तक घेणे ही नवी पद्धत नाही, शरद पवारांनी संजय मंडलिकांना फटकारले

पुणे । प्रतिनिधी

आताचे महाराज हे कोल्हापूरचे आहेत का? ते खरे वारसदार नाहीत, अशी टीका शिवसेना शिंदे गटाचे खासदार आणि कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार संजय मंडलिक यांनी केली होती. मंडलिक यांच्या या विधानावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यांचे विधान म्हणजे कोल्हापूरच्या गादीचा अपमान असल्याची टीका होत आहे. याबाबत माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनीही पत्रकार परिषदेत प्रतिक्रिया दिली आहे.



शाहू महाराज यांबाबत सामान्य लोकांमध्ये कृतज्ञता आहे. असे असताना शाहू महाराजांविषयी असे वक्तव्य करणे याचा अर्थ राजकारण किती खालच्या पातळीवर गेले आहे हे दिसत आहे, असे म्हणत शरद पवार यांनी संजय मंडलिक यांना फटकारले आहे.

राजघराण्यात मूल दत्तक घेणे ही नवी पद्धत नाही. दत्तक मूल घेतल्यावर तो त्या घराण्याचा प्रतिनिधी होतो. आज ज्यांच्याबद्दल बोलले जात आहे, याचा अर्थ किती खालच्या पातळीवर प्रचार सुरू आहे हे दिसते. शाहू महाराज यांची जनमाणसात चांगली प्रतिमा आहे. त्यांचे सामान्य माणसात चांगले काम आहे. असे असताना त्यांच्याबद्दल बोलले जात आहे, याचा अर्थ प्रतिस्पर्धी उमेदवाराची मानसिकता काय आहे हे लक्षात घ्या, असे शरद पवार म्हणाले